**Lecture on Importance of English in Competitive Examination and Different Opportunities of Career in Armed Forces.**

# स्पर्धा परीक्षेसाठी मराठीसह इंग्रजी भाषेतही पारंगत होण्यावर भर द्यावा

## नूतन मराठा महाविद्यालयात डॉ. अतुल सूर्यवंशी यांचा मोलाचा सल्ला

**प्रतिनिधी** | जळगाव

स्पर्धा परीक्षा असो की सैनिकी क्षेत्रातील अधिकारी पदाच्या परीक्षा. त्यासाठी इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व असल्याने स्वभाषेचा आदर सन्मान करत इंग्रजी भाषेला देखील आपलेसे केले पाहिजे, असा सल्ला प्रा. डॉ. अतुल सूर्यवंशी यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिला.

नूतन मराठा महाविद्यालयात इंग्रजी विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पर्धा परीक्षा अन् सैनिकी क्षेत्रातील नोकरीत इंग्रजी भाषेचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. या प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. डी. आर. चव्हाण, डॉ. आफाक शेख, प्रा. शिवराज पाटील आणि प्रा. एच. एस. वानखेडे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून स्वागत करण्यात आले. वक्त्यांचा परिचय शिवराज पाटील यांनी करुन दिला. प्रास्ताविक डॉ. आफाक शेख यांनी केले. इंग्रजी शिकण्याचे सहज सोपे टप्पे ज्यात उच्चारशास्त्र, शब्दसंरचना शास्त्र, व्याकरण, शब्दसंग्रह, महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ, तोडकं मोडकं इंग्रजी बोलण्याचा सराव अशा टिप्स देवून इंग्रजी भाषेचा उगम ते अलिकडे बोलली जाणारी इंग्रजी भाषेपर्यंतचा प्रवास अगदी सहज, सोप्या शब्दात डॉ. सूर्यवंशी यांनी उलगडा. सुत्रसंचालन प्रा. गजाला शेख यांनी केले. दरम्यान, उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. प्रा. जीवन सिसोदे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. घनश्याम पाटील, प्रा. रत्नाकर कोळी व राष्ट्रीय छात्रसेना विभागाच्या विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.